# कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थशास्त्र विचार मंच

(कोल्हापूर व कोकण विभाग)

आणि

वाळवा तालुका एज्युकेशन सोसायटीचे

(अमृत महोत्सवी वर्ष)

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, इस्लामपूर

(सुवर्ण महोत्सवी वर्ष)





## २० वे वार्षिक अधिवेशन

दि.७ व ८ डिसेंबर २०१९



# अर्थवेध

ISBN 978-81-938479-3-0

ISBN - 978 - 81- 938479 - 3 - 0

# कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थशास्त्र विचार मंच

(कोल्हापूर व कोकण विभाग)



**२० वे**
**वार्षिक अधिवेशन**



दि.७ व ८ डिसेंबर २०१९

✻ संयोजक ✻

वाळवा तालुका एज्युकेशन सोसायटीचे

## यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, इस्लामपूर

(सुवर्ण महोत्सवी वर्ष)

# अर्थवेध


मुख्य संपादक :
प्रा.डॉ.बी.पी.पाटील


संपादन समिती सदस्य :
प्रा.पी.एन.पाटील
प्रा.डॉ.एस.एस.पाटील

अर्थशास्त्र विचार मंच-संपादन सदस्या :
प्रा.आर.एन.पाटील
प्रा.विजय मेटकरी
प्रा.शरद शेटे

प्रकाशन :
स्मिता प्रेस, इस्लामपूर.
मोबा.: ९८६०३५६१९२

प्रकाशन :
७ डिसेंबर २०१९

मुद्रक :
स्मिता प्रेस, इस्लामपूर. ता.वाळवा,
जि.सांगली. मो.: ९८६०३५६१९२

## विभाग दोन :

### ब) नवीन आर्थिक धोरणात सहकाराची भूमिका

१) प्रा.भोसले-पाटील मानसी
२) प्रा.कचरे अलका मारूती
३) प्रा.शहा ए.आर.
४) प्रा.चिंदरकर विनोद महादेव
५) प्रा.सौ.वैद्य आशावरी अ.
६) प्रा.सौ.देशपांडे सुरेखा सुदेश

## विभाग तीन :

### क) दक्षिण महाराष्ट्रातील महापूर : आपत्ती व संधीक

१) डॉ.पाटील बी.पी.
२) डॉ.शिंदे ए.आर. / प्रा.इनामदार प्रशांत जयवंत 114
३) प्रा.कु.मोकळे सुनिता आनंदा
४) प्रा.तोडकर मधुकर बाबुराव
५) प्रा.सौ.तावडे प्रमिला सुदेश

# कृष्णा नदीच्या महापुरातील हानीचे परिणाम, वस्तूस्थिती अन् उपाय...





प्रा.डॉ.अशोक रामचंद्र शिंदे, विभागप्रमुख
प्रा.प्रशांत जयंत इनामदार, सहाय्यक प्राध्यापक
वाणिज्य विभाग, वाय.सी.कॉलेज, इस्लामपूर

**प्रस्तावना-**

सन २००६ सालानंतर म्हणजे १३ वर्षानंतर आलेल्या प्रचंड महापुराने दक्षिण महाराष्ट्रात प्रामुख्याने कृष्णा, वारणा, पंचगंगा या नद्यांचे पाणी पात्राबाहेर पडले. दक्षिण महाराष्ट्रात सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यात घरांची, पिकांची अपरिमित हानी झाली. या हानीत कोट्यावधी रूपयांचे नुकसान झाले. हजारो जनावरे दगावली. वाळवा व शिराळा तालुक्यातील नदीकाठच्या गावांमधील सुमारे ५० हजारहून अनेक लोकांना स्थलांतरित व्हावे लागले. या परिस्थितीत प्रत्यक्षदर्शी पूरग्रस्तांच्या समस्या व त्यांच्या समोरील संकटे जवळून पाहता आली. त्यातीलच वस्तुस्थिती, परिणाम व उपाययोजनांच्या दृष्टीने हा अभ्यास विषय निवडला आहे.

**उद्देश -**

१) महापुरातील पूरस्थितीचा आढावा घेणे.

२) महापुराच्या परिणामांमुळे झालेल्या हानीचे अवलोकन करणे.

३) पूरग्रस्तांच्या समस्यांचा अभ्यास करणे.

४) उपाययोजना व मदतीचा आढावा घेणे.

कृष्णा नदीच्या महापुरातील हानीचे परिणाम, वस्तुस्थिती अन् उपाय....

सलग दहा-बारा दिवसापासून कोसळणारा मुसळधार पाऊस व धरणातून सुरू प्रचंड पाण्याचा विसर्ग यामुळे वारणा-कृष्णा नद्यांना पूर आला. तालुक्यात पावसाचा कहर सुरू झाला होता. ऑगस्ट २०१९ च्या पहिल्या पंधरवड्यात वाळवा व शिराळा तालुक्यातील कृष्णा-वारणा नद्यांना पूर आला.सर्व पूरग्रस्त लोकांच्यासाठी पंचायत समिती व ग्रामपंचायत यांच्यामार्फत सर्व प्रकोरची मदत करण्यात आली. प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये पूरग्रस्त लोकांच्या करीता पुरेसा औषध साठा उपलब्ध केला होता. गरजेनुसार वैद्यकीय पथके तैनात केली होती. पूरग्रस्त गावातील जनावरां करीता पुरेसा औषधसाठा पशुवैद्यकीय दवाखान्यात उपलब्ध केला. पुरग्रस्त भागातील स्थलांतरित लोकांच्यासाठी राहण्याची, जेवणाची सोय करण्यात आली होती. ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात वाळवा तालुक्यात पूरस्थिती गंभीर २५० कुटूंबाचे स्थलांतर झाले.

वाळवा तालुक्यात पूरस्थिती गंभीर होत चालली. आधी १२ गावात पुराचे पाणी शिले, कणेगाव, भरतवाडी, ऐतवडे खुर्द, बोरगांव, जुनेखेड या गावातील सुमारे २५० कुटुंबाचे स्थलांतर करण्यात आले. ताकारी पुल पाण्या-

 ISBN - 978 - 81 - 938479 - 3 - 0

खाली गेले. अन्य ठिकाणच्या लोकांचेही स्थलांतर करण्याचे काम प्रशासनाकडून सुरू झाले. या महापूराचे काही परिणाम व परिस्थिती पुढील घटकांच्या आधारे मांडता येईल÷

**१) धरणातील पाण्याचा विसर्ग व मुसळधार पाऊस -**

कृष्णा-वारणा नद्यांना पुर आल्याने नदीकाठच्या गावातून पाणी शिरले. वारणा नदीचे पाणी कणेगांव, भरतवाडी, ऐतवडे खूर्द, चिकुर्डे, कुंडलवाडी तर कृष्णा नदीचे पाणी बोरगांव, गौंडवाडी, मसूचीवाडी, जुनेखेड, शिरगाव, वाळवा या गावातून व वस्त्यांवर शिरले. पुराचा फटका बसल्याने कुटुंबाना व जनावरांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले. स्थलांतर करण्यात आलेल्या कुटुंबाची शाळा, मंगल कार्यालयातून राहण्याची व्यवस्था करण्यात आली. तर काहींनी नातेवाईकांच्याकडे आसरा घेतला. काहीवेळा रात्री पावसाचा जोर ओसरत असे, पण पूर काहीसा ओसरला तरी भरून वाहणाऱ्या ओढ्यांचे नदीला मिसळणारे पाणी व धरणातून होणारा विसर्ग यामुळे नद्यांच्या पाण्याची पातळी सतत वाढत राहिली. त्यामुळे पुराचा धोका आणखी वाढत होता. पाणी रस्त्यावर आल्याने बोरगांव-ताकारी, ऐतवडे खुर्द-वारणानगर, कुंडलवाडी-तांदुळवाडी, कुंडलवाडी-येलूर, येडेनिपाणी-इस्लामपूर, बोरगांव-नवेखेड हे मार्ग बंद राहिले.

**२) प्रशासनाची व समाजाची सहकार्याची भुमिका-**

तालुक्यातील बोरगाव नदीकाडील परिसरातील सुमारे १५० कुटुंबे पहिल्या टप्प्यात स्थलांतरित करण्यात आली. शेकडो एकर शेती पाण्याखाली गेली. कोयना पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर आणि धरणातील विसर्ग यामुळे पाणी पातळीत झपाट्याने वाढ होत होती. ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण असूनसुध्दा काही ठिकाणी प्रशासन मात्र ढिम्म अवस्थेत होते.

**३) वारणेची धोक्याची पातळी -**

वारणा नदीला आलेल्या महापुराने वारणाकाठी विविध गावांमध्ये दैना केली. धोक्याची पातळी ओलांडली. पुराच्या पहिल्या टप्प्यात पाण्याची पातळी २००५ च्या सीमा-रेषवर गेली होती. शेकडो लोकांना स्थलांतर केले गेले. पर्वतवाडीच्या पुराच्या पाण्याचा वेढा पडला. संपूर्ण लोकवस्तीसह शेती वस्ती रिकामी झाली. लोकवस्तीच्या ठिकाणी पुराचे पाणी आल्यामुळे लोकांचे स्थलांतर झाले. अतिवृष्टी व पुरामुळे वाळवा तालुक्यातील कृष्णा वारणा नदीकाठच्या गावातील संभाव्य हानी टाळण्यासाठी, योग्य त्या उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली.

**४) पूर पर्यटकांच्या प्रचंड गर्दीने पूरग्रस्थांच्या मदतीत अडथळे -**

कृष्णाकाठच्या परिसरात पाऊस थांबायला तयार नव्हता. कृष्णा-वारणाकाठी पुराचे पाणी नुसतं दुथडी नव्हे तर आजूबाजूच्या गावोगावात.... घरा-गोठ्यात शिरले.. पूलं पाण्याखाली जाताना नदीकाठच्या पूरग्रस्तांच्या समस्यांनाही 'पूर' आला होता. जीवघेण्या पूरातून वाचण्यासाठी...प्रापंचिक साहित्यांची हलवाहलव करण्यासाठी...दुभत्या जनावरांच्या स्थलांतरासाठी... नदीकाठच्या मोटारी


ISBN - 978 - 81 - 938479 - 3 - 0

अन् शेती उपयोगी साहित्य हलविण्यासाठी पूरग्रस्तांची अक्षरशः धावाधाव सुरू झाली होती.

**५) हजारो कुटूंबाचे स्थलांतर -**

वाळवा तालुक्यात सन २००५-०६ पेक्षा पूरस्थिती भयंकर होती. आत्तापर्यंत २८ गावांना पूराचा फटका बसला होता. १ हजार ४८० कुटूंबातील ६ हजार ४४१ जणांचे स्थलांतर करण्यात आले. तर ३ हजार जनावरांनाही सुरक्षितस्थळी हलविले. पुराचे पाणी पुणे-बेंगलोर महामार्गावर आल्याने महामार्ग ठप्प झाला. एन.डी.आर.एफ.ची पथके मदत कार्याला लागली.

**६) महापूरामुळे वाळवा तालुक्यातील जनजीवन विस्कळीत-**

महापूराच्या रूद्रावतारामुळे वाळवा तालुक्यातील नदीकाठच्या गावातील जनजीवन विस्कलीत झाले होते. अनेक गावात प्रशासनाची मदत पोहोचली नसल्याच्या तक्रारी यंत होत्या. तर दुसरीकडे पूरग्रस्तांच्या मदतीसाठी अनेक हात पुढे आले होते. सर्व पूरग्रस्तांच्यापर्यंत मदत पोहोचविण्यास प्रशासन कमी पडत असल्याने अनेक सामाजिक संस्था, दानशूर व्यक्ती पुढे आल्या.

'गावोगाव मदत कार्यासाठी थांबलेल्या लोकांना मुलभूत सुविधांचा तुटवडा जाणवू लागला. पूरबाधित गावातील काही प्राथमिक आरोग्य केंद्रही पाण्याखाली गेलेले होते.

**७) हजारो पूरग्रस्तांकडे दुर्लक्ष -**

वाळवा तालुक्यातील पावसामुळे महापुराची तीव्रता सन २००५ ची पुररेषा ओलांडून गेली होती. अद्यापही वाळवा, कृष्णा व वारणा नदीच्या तालुक्यातील गावांना आपत्तीकालिन पूर अवस्था, आरोग्य व्यवस्था, विजेची व्यवस्था झालेली नाही असे दिसून येतो.

**८) वाळवा तालुक्यात 'जल तांडव अन् मदत कार्यही...'**

वाळवा तालुक्यात पूरस्थिती अधिकच गंभीर बनली होती. तालुक्यातील ११ ठिकाणी अजून लोक पूरात अडकले होते. पुराच्या पाण्यामुळे जनावरे दगावली होती. तर काही वाहून गेले होते. तालुक्यातील ४५ हजारपेक्षा जास्त लोकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्यात आलेले होते. प्रशासनाकडून लोकांना बाहेर काढण्यासाठी युध्द पातळीवर प्रयत्न सुरू होते. शिरगाव, वाळवा, रेठरेहरणाक्ष, कणेगाव, फार्णेवाडी, गौंडवाडी, साटपेवाडी, बहे आदी ठिकाणी लोक पुरात अडकले होते. त्यांच्या मदतीसाठी एनडीआरएफच्या दोन पथके दाखल झाली.

**९) पूरग्रस्तांच्या मदतीत सरकार मागे : दानशूरांचे हात पुढे-**

वाळवा तालुक्यात महापुराने सर्वत्र हाहाकार उडविला होता. विस्थापित झालेल्या हजारो पूरग्रस्तांना प्रशासनाकडून योग्य ती मदत मिळत नसल्याच्या तक्रारी वाढू लागल्या होत्या. अशातच अनेक सामाजिक संघटना, संस्था, दानशूर व्यक्ती, लोकप्रतिनिधील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी पुढे आल्याने पूरग्रस्तांना मोठा दिलासा मिळाला.

पूरग्रस्तांना निवास, भोजन, कपडे, वैद्यकिय साहित्य, पिण्याचे पाणी, अशा अत्यावश्यक सुविधा पुरविण्यासाठी शेकडो मदतीचे हात पुढे आले.

१०) पूरासंदर्भात सांख्यिकीय माहिती -

| नुकसान व जाहीर मदतीची संक्षिप्त आकडेवारी |
|---|
| ४,७०८ कोटी |
| कोल्हापूर, सांगली, सातारा, या तीन जिल्ह्यांसाठी मदत |
| २,१०५ कोटी |
| कोकण विभाग, नाशिक व उर्वरित महाराष्ट्रातील काही भागांसाठी मदत |
| २,०८८ कोटी |
| शेती नुकसान भरपाई |
| ३०० कोटी |
| आपद्ग्रस्त कुटूंबाना मदत |
| २२२ कोटी |
| घर बांधणीसाठी तरतूद |
| ८७६ कोटी |
| रस्ते, पुल बांधणी |
| ३०० कोटी |
| व्यापारी, हॉटेल चालकांना मदत |

**सांगली जिल्ह्यातील अतिवृष्टी, महापूरामुळे बाधित शेतकरी, क्षेत्र**

| तालुका | गाव | शेतकरी | क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|---|
| मिरज | २७ | २९२४२ | १४८३८ |
| वाळवा | ४४ | ३३२९० | १६१९० |
| पलुस | ३१ | १९२४० | १४६८० |
| शिराळा | ९५ | ३३२५० | १९६६६ |
| कडेगाव | ३४ | १२१५ | २७१ |
| तासगाव | ४ | ९९४ | ४८३ |
| एकूण | २३५ | १२०२३१ | ६६०९८ |

पुरामुळे विस्थापित झालेले लोक, जनावरे

| तालुका | गाव | विस्थापित लोक | जनावरे |
|---|---|---|---|
| मिरज | २० | ५२५१४ | ६६१ |
| पलुस | २५ | ३७७२० | ११२५१ |
| वाळवा | ३७ | ६५५४७ | १५१३५ |
| शिराळा | ३१ | ३१८२ | २७२७ |
| सांगली महा-पालिका क्षेत्र | | १३७००० | |

**निष्कर्ष-**

नैसर्गिक आपत्ती (पूर परिस्थिती) ही कोणत्याही क्षणी येणारी व टाळता न येणारी असल्याने नदीकाठच्या लोकांनी विशेषत: जून ते सप्टेंबर/ऑक्टोबर दरम्यान पूर येण्याअगो-दरच सतर्क राहणे गरजेचे आहे. तसेच प्रशासनानेसुध्दा पूरजन्य परिस्थिती निर्माण होण्याअगोदर नदीकाठच्या गावच्या सर्व लोकांना धोक्याचा इशारा देवून सतर्क करणे व वेळीच त्यांचे स्थलांतर करणे आवश्यक आहे.

पूरामुळे ज्या लोकांचे घर, जनावरे, घरातील साहित्य, इतर वस्तू वाहून जातात किंवा मनुष्यहानी व वित्तहानी होते. त्यानंतर शासनाने त्या पूरबाधित लोकांना आवश्यक ती नुकसान-भरपाई वेळेत देणे आवश्यक आहे. कारण अशा नुकसान भरपाईच्या रकमा नोव्हेंबर २०१९ पर्यंत अनेक ठिकाणी मिळाल्या नव्हत्या.

शासकीय अधिकाऱ्यांना संभाव्य धोके काय असू शकतात, आणि आपण काय उपाय करायला हवेत, प्रशासनाने अधिक सतर्क राहून संभाव्य हानी टाळण्यासाठी योग्य ती उपाय-योजना करायला हवी. तसेच तहसिलदार


ISBN - 978 - 81 - 938479 - 3 - 0

कार्यालयात २४ तास पुरग्रस्त कक्ष सुरू करण्याची मागणी पुढे आली.

महापुरातील नुकसान टाळण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन प्रबोधनाची गरज आहे. महसूल प्रशासन व पोलिसांच्या सहकार्याने सामाजिक संस्थांची, मंडळांची, दानशूर व्यक्तींची मदत घेता येणे शक्य आहे. त्यासाठी या सर्व घटकांत सामुहिक प्रयत्न व समन्वयाची गरज आहे.

**उपाययोजना -**

पाण्यामुळे वाळवा तालुक्यातील कृष्णा व वारणा नदीकाठच्या गावांना पुराचा धोका वाढला. प्रशासनाने अधिक सतर्क राहून संभाव्य हानी टाळण्यासाठी योग्य ती उपाययोजना करायला हवी. तहसिलदार कार्यालयात २४ तास पूरग्रस्त कक्ष सुरू करण्याची गरज आहे. तलाठी, ग्रामसेवक, शाळा व हायस्कूलच्या मुख्याध्यापकांना नेमणूकीच्या गावीच मुक्काम करण्याच्या सूचना देता येतील. आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी तालुक्यातील कंत्राटदारांचे जेसीबी, पोकलॅन्ड व डंपरची यंत्रणा कोणत्याही क्षणी तयार करण्यात यावी, तहसिलदार कार्यालयातील पुरवठा विभागाकडून पुरेसा धान्यसाठा करण्यात यावा, अशा उपाययोजनात्मक बाबी करणे आवश्यक आहे.

एनडीआरएफ पथकाकडुन महापूरात अडकलेल्या व्यक्तींना बाहेर काढण्यासाठी बोटींची व्यवस्था व त्याची पूर्वतयारी करण्यात यावी. पूरग्रस्त रूग्णांना तपासण्यासाठी शासकीय व खाजगी डॉक्टरना सूचना देण्यात याव्यात.तसेच वेळप्रसंगी लागणाऱ्या औषधांचा जादा साठा करून ठेवण्यात यावा. तसेच अफवा पसरविण्याऱ्या व्यक्तींच्यावर नजर ठेवून प्रतिबंध करण्यात यावा अशा उपाययोजना करता येतील.

कोयना, चांदोली धरणातील पाण्याचा विसर्ग संबंधित नद्यांच्या पाणलोट क्षेत्रातील पडत्या पावसाचा विचार करून ठरविण्यात यावे. अलमट्टी धरणासारख्या मोठ्या धरणातील महापूराच्या काळातील विसर्गाचे प्रमाण महाराष्ट्र-कर्नाटक राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या स्तरावर योग्य तो निर्णय घेवून ठरविण्यात यावा. उदा: २०१९ च्या महापूरात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या सूचनेने अलमट्टीचा विसर्ग जादा केल्यावर सांगली-कोल्हापूर जिल्ह्यातील पूरस्थिती आटोक्यात आली.

**संदर्भ-**

१) www.pudhari.com
२) दै.पुढारीमधील विविध बातमीपत्रे.
३) इस्लामपूर उपविभाग महसूल प्रशासनाकडून वेळोवेळी जाहीर झालेली आकडेवारी.
४) पूरग्रस्त ग्रामपंचायतींनी केलेल्या आवाहनाची पत्रके.